जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
09 MAR 2020

Times of India

## Awareness on coronavirus at SUK

An awareness lecture on coronavirus was organized at the Shivaji University, Kolhapur (SUK), last week. Dr. V A Ranade, medical officer at the university's health centre, guided administrative and faculty members about the safety measures to be taken to avoid the infection.

## Workshop at chemistry department of SUK

A two-day workshop on 'Emerging trends in chemical and material sciences' was conducted at the department of chemistry of the Shivaji University, Kolhapur, last week.

Over 200 researchers participated in the workshop.

The department has completed 54 years and has the unique distinction of publishing over 2,000 research papers, which proves to be a major achievement.

The department has also witnessed graduation of 100 M.Phil students and over 700 Ph.D students.

# गांधीजींचे विचार बदलत्या काळाशी सुसंगत

## टेरी बेटझील : यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्य असो की ग्रामोद्योग, व्यक्तिगत आचरण असो की राहणीमान; पर्यावरण, आरोग्य, सर्वधर्मसमभाव; एक नव्हे तर अनेक विषयांवर त्यांनी मांडलेली मते आजच्या बदलत्या काळात सुसंगत असल्याचे दिसून येते, असे प्रतिपादन यू. एस. ए. येथील जेम्स मॅडिसन युनिव्हर्सिटीतील महात्मा गांधी सेंटर फॉर ग्लोबल नॉन व्हायोलन्सचे संचालक डॉ. टेरी बेटझील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमार्फत 'राजारामबापू पाटील आणि महाराष्ट्रातील सहकार

एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. याप्रसंगी 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, माजी आमदार

विजय चोरमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संपादक वसंत भोसले म्हणाले, महाराष्ट्रातील स्थापनेनंतर प्रचलित राजकारणावर राजारामबापू आणि

आपला प्रभाव ठेवला होता. दोघेही एकाच पक्षात होते, एकाच विचाराचे होते, तरी काही मतभेद होऊन संघर्ष निर्माण झाला होता. मात्र, तो धोरणात्मक होता. राजारामबापू यांनी राजकीय जीवनातही त्यांना मिळालेल्या संधीचे सोने केले. सहकार क्षेत्रात त्यांनी सर्वांगीण विकासाचे जे गौरवशाली कार्य केले, त्यामागे लोकसेवेची दृढ भावना होती.

ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे म्हणाले, राजारामबापूंनी 'गाव तिथे शाळा व शाळा तिथे इमारत' या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार केला. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट झाला.

प्रास्ताविक चंद्रकांत लांगरे यांनी केले. डॉ. नीलम जाधव यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक गजानन



शिवाजी विद्यापीठात शनिवारी आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. टेरी बेटझील यांनी मार्गदर्शन केले.

### आमचे आयकॉन

तरुण कार्यकर्त्यांना राजारामबापू नेहमी प्रोत्साहन देत होते. ते आमचे आयकॉन होते, असे माजी आमदार शरद पाटील यांनी याप्रसंगी सांगितले. आयुष्यभर त्यांनी लोकशिक्षणाचे काम केले. राजारामबापू पाटील 'पदयात्री' म्हणून राज्याला परिचित आहेत. सांगली जिल्ह्याच्या दुष्काळी भागाचे प्रश्न समजून घेण्यासाठी त्यांनी सांगली ते उमदी अशी पदयात्रा काढली होती, असे त्यांनी सांगितले.



# मटेरिअल सायन्समधील संशोधन उपयुक्त

## डॉ. दिलीप ढवळे: रसायनशास्त्र विभागात परिषद

कोल्हापूर टाइम्स टीम

'समाजातील विविध समस्यांवर रसायनशास्त्र व मटेरियल सायन्स या विभागांतील तज्ज्ञांनी एकत्र येऊन काम केले, तर सामाजिक समस्यांचे सहजपणे निराकरण करता येईल,' असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. दिलीप ढवळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात आयोजित 'इमरजिंग ट्रेण्डस इन केमिकल अँण्ड मटेरियल सायन्सेस' या विषयावरील परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. पी. एस. पाटील होते.

विभागप्रमुख प्रा. डॉ. जी. एस. गोकावी यांनी संशोधन प्रकल्पांची उपयुक्तता या विषयावर विवेचन केले. दोन दिवसीय परिषदेत २०० हून अधिक संशोधक सहभागी झाले. तसेच, १०० हून अधिक संशोधकांनी रसायनशास्त्रातील विविध विषयांवर भितीपत्रकाद्वारे संशोधनाची मांडणी केली.

या परिषदेत भारतातील विविध संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञ, तज्ज्ञ प्राध्यापक, मान्यवर, रसायनशास्त्राशी संबंधित ग्रीन केमिस्ट्री, नॅनो टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, पॉलिमर सायन्स, बायो टेक्नॉलॉजी आदी विषयांवर व्याख्याने, संशोधकांचे शोधनिबंध सादर झाले. परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ. के. एम. गरडकर यांनी स्वागत केले.

# कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी हस्तांदोलन टाळा

## डॉ. व्ही. ए. रानडे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना विषाणूचे संसर्ग टाळण्यासाठी हस्तांदोलन करणे, मिठी मारणे, गर्दीच्या ठिकाणी जाणे, प्रवास करणे टाळावे. साबणाच्या पाण्याने हात स्वच्छ धुऊन घ्यावेत. कार्यालयीन कामाची ठिकाणे नेहमी स्वच्छ व सुरक्षित राहतील यासाठी दक्ष असले पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी केले.

विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रामार्फत 'करोना विषाणू आजारासंदर्भात प्रतिबंध व नियंत्रण' याबाबतची शाहू सिनेट सभागृहामध्ये आयोजित केलेल्या मार्गदर्शनपर बैठकीमध्ये डॉ.रानडे बोलत होत्या.

डॉ.रानडे म्हणाल्या, कोरोना विषाणू संसर्गामुळे जगभरामध्ये होणारे मृत्युचे प्रमाण पाच टक्के आहे. रोगप्रतिकार शक्ती कमी असलेल्या लोकांमध्ये याची लागण लवकर होण्याची शक्यता असते. परंतु, कोरोनाच्या भीतीने घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. काही त्रास जाणवत असल्यास नजीकच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. स्वाईन फ्ल्यू आणि करोना विषाणू आजार जवळपास एकसारखाच आहे. स्वाईन फ्लूवर औषधे उपलब्ध आहेत, त्यामध्ये मृत्यूचे प्रमाण नगण्य आहे. परंतु, कोरोनावर औषधे उपलब्ध नाहीत. त्यामुळे योग्य ती खबरदारी घेणे हाच उत्तम उपाय आहे. सर्दी होणे, शिंका येणे, घशामध्ये खवखवणे, खोकला येणे, निमोनिया होणे ही लक्षणे आहेत. खोकल्यामुळे हवेत सूक्ष्म कण पसरतात, त्यामुळे त्याचा प्रादुर्भाव वाढतो, अशावेळी गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. सर्दी, थकव्याचा त्रास जाणवत असल्यास त्वरित उपचार करून घेऊन विश्रांती घेणे गरजेचे आहे. दिवसातून तीन ते चार लिटर पाणी पिणे आवश्यक आहे.

टेबल, खुर्ची आपल्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ कपडयाने पुसून घेणे आवश्यक आहे. सर्दी झालेल्या व्यक्तींनी टिशू पेपरचा वापर करून बंद कचरापेटीत टिशू पेपर टाकावा. साबणाचे पाणी हातावर घेतल्यानंतर वीस सेकंद सर्व बाजूने आपले हात स्वच्छ धुऊन घेणे आवश्यक आहे.

**रानजाई :** महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे 'रानजाई' कार्यक्रम. स्थळ : राजर्षी शाहू सभागृह, विद्यापीठ. वेळ : दुपारी २.३० वाजता.

**चित्रपट प्रदर्शन :** जागतिक महिला दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'वुमेन अॅट वॉर' या चित्रपटाचे प्रदर्शन. स्थळ : वि. स. खांडेकर सभागृह, विद्यापीठ. वेळ : दुपारी ४ वाजता.